लातूर भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले
सांज दैनिक : गुरूवार - ३ ऑगस्ट २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १२५
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◀ दर मंगळवारी ▶
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

## रानकविता पोरक्या झाल्या

# कवी ना. धों. महानोर यांचे निधन



पुणे : रानकवी, ज्येष्ठ साहित्यिक ना. धों. महानोर यांचे आज निधन झाले. ना. धों. महानोर यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी पुण्यातील रुबी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. निसर्गकवी आणि गीतकार अशी ना. धों. महानोर यांची ओळख होती. ना. धों. महानोर यांच्या निधनाच्या बातमीने साहित्यविश्वावर शोककळा पसरली. ना. धों. महानोर यांच्यावर उद्या पळसखेड या त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

ना. धों. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी झाला. महानोरांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेडच्या शेतकरी कुटुंबात झाला. महानोरांनाचार भाऊ आणि तीन बहिणी आणि ते घरात थोरले होते. महानोरांचे प्राथमिक शिक्षण हे पळसखेडमध्ये झाले. यानंतरच्या शिक्षणासाठी शेंदुर्णीच्या शाळेत प्रवेश घेतला होता. या शाळेत जाण्यासाठी महानोर हे दरोरोज ८-१० कि.मी. अंतरावर दूर असलेल्या शाळेत जात होते. या शाळेत असताना महानोरांना कवितेची ओळख झाली. मराठवाडी बोलीतल्या 'पानझड', 'तिची कहाणी' 'पळसखेडची गाणी' सारख्या लोकगीतांनी मराठी साहित्य समृद्ध केले.

### अखेर हा वृक्ष उन्मळून पडला - शरद पवार

ना. धों. महानोर यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भावनिक ट्वीट करून श्रद्धांजली वाहिली आहे. शरद पवार यांचे महानोर यांच्याशी कौटुंबिक संबंध होते. शरद पवारांनी ट्वीटमध्ये म्हटले, ना. धों ची विधान परिषदेतील भाषणे देखील माणसाच्या काळजाचा ठाव घेत. ना. धो. खूपच हळवे , त्यात पत्नीच्या निधनाने ते आणखी खचले. मी , प्रतिभा त्यांच्या खचलेल्या मनाला उभारी देत राहिलो. पण अखेर हा वृक्ष उन्मळून पडला.

### मातीचे गीत गाणारा अस्सल माणूस-मुख्यमंत्री

राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी कवी ना. धों. महानोर यांच्या निधनाने मातीचे गीत गाणारा अस्सल माणूस काळाच्या पडद्याआड गेला आहे. अक्षरे आणि मातीचे नाते जोडले पण आपल्या लेखणीतून मांडून त्यांनी अक्षरशः कवितेचे अंकूर फुलविले, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

### मराठी साहित्याला मातीचा गंध दिला - अजित पवार

'रानकवी' होते. निसर्गाच्या सानिध्यात राहून त्यांनी साहित्यसेवा केली. मराठी साहित्याला मातीचा गंध दिला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ना. धों. महानोर यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. अजित पवारांनी ट्वीटमध्ये म्हटले , ज्येष्ठ साहित्यिक ना. धों. महानोर खऱ्या अर्थानं 'रानकवी' होते. निसर्गाच्या सानिध्यात राहून त्यांनी साहित्यसेवा केली. मराठी साहित्याला मातीचा गंध दिला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचं जीवन, ग्रामीण संस्कृतीचं वैभव मराठी साहित्यात आणलं.

### महानोर यांनी कवितेला हिरवा शालू नेसवला-देवेंद्र फडणवीस

ज्येष्ठ कवी पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या निधनाने रसिक मनाला रानाशी मैत्र घडवून देणारा कवी हरपला आहे. ना. धों. महानोर यांनी कवितेला हिरवा शालू नेसवला. निसर्ग आणि स्त्री ही महानोरांच्या कवितेची केंद्रस्थाने आहेत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ना. धों. महानोर यांना श्रद्धांजली वाहिली आहे.त्यांच्या निधनाने मराठी साहित्याला एका वेगळ्या उंचीवर नेणारा महान साहित्यिक आपण गमावला आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## क्वॉलिटी, मुदतीत काम नाही; 'शारदा' च्या

# ६० कोटीच्या कामाची चौकशी करा

**लातूर : लातूर शहर महानगरपालिका हद्दीत सीसीरोड, बी.टी. रोड, गटार, डिव्हायडर आदी सुमारे ६० कोटी ८९ लाख रूपयांचे कामे करण्याचा करार शारदा कन्स्ट्रक्शन आणि कार्पोरेशन प्रा. लि. यांना दिला. हि कामे १२ महिन्यात क्वॉलिटीची करण्याचा करार झाला असतानाही केवळ ४०% कामे झाली आहेत. तेही निकृष्ट असून या कामाची चौकशी करावी व कराराचा भंग केल्याने त्यांच्याकडील कामे काढून घ्यावीत अशी मागणी आरटीआय कार्यकर्ता मलीकार्जून भाईकट्टी यांनी लातूर महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**

लातूर शहर महापालिकेने शारदा कन्स्ट्रक्शन अॅण्ड कार्पोरेशन प्रा. लि. यांच्यासोबत शहरातील सिमेंट रस्ते, गटार, डिव्हायडर, बी. टी. रोड ही ६० कोटी ८९ लाख ५३ हजार २६३ रूपयांची कामे दर्जेदार आणि १२ महिन्याच्या आत पूर्ण करण्याचा रितसर करार १० जून २०२२ रोजी केला. त्यांना दिलेली मुदत संपून दोन महिने अधिक झाली असली तरी शारदा कन्स्ट्रक्शनचे काम अद्याप ४० ते ४५ % पर्यंतच आहेत. शिवाय सदर कामे निकृष्ट आहेत असा आरोप मलीकार्जून भाईकट्टी यांनी घेतला आहे. हा करार करीत असताना मंजूर काम दिलेल्या मुदतीत झाले नाही तर प्रत्येक दिवसागणीत दंड ठोठावण्यात येईल, अशी शर्त आहे. हा दंड आकारावा, झाल्या कामाच्या क्वॉलिटीची बाहेर जिल्ह्यातील सा. बां. विभागाच्या क्वॉलिटी कंट्रोलकडून चौकशी करण्यात यावी. शारदाकडून हे काम काढून घेऊन अन्य सक्षम कन्स्ट्रक्शन कंपनीला द्यावे, अशी मागणी आरटीआय कार्यकर्ता मलीकार्जून भाईकट्टी यांनी लातूर शहर महानगरपालिका आयुक्तांकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे. शारदा कन्स्ट्रक्शन कडून ६० कोटींची हि कामे अर्धवट अवस्थेत तशीच आहेत. त्यामुळे त्या कामाचा दर्जा राहत नाही, असेही तक्रारीत म्हटले आहे.

या एजन्सीकडून शहरात काम चालू करण्याअगोदर पालिका अभियंत्यांकडून 'लाईन आऊट' घेतले का? काम चालू करण्याअगोदर प्रत्येक कामाच्या ठिकाणचे फोटो सादर केले आहेत का? कामाचे प्रत्येक टप्प्यावर पालिका अभियंत्यांचे मार्गदर्शन घेतले का? १२ महिन्यात कामे पूर्ण करण्याचा ठेका दिलेला असताना व ती मुदत संपून गेली असताना कामे ४० ते ४५ % एवढेच का? ती कामे क्वॉलिटीचे आहेत का? मुदतीत कामे पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत. पालिका प्रशासनाने वेळेत न क्वॉलिटीचे काम करवून घेण्यासाठी पाठपुरावा केला का आदी अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# विजय वडेट्टीवार विरोधी पक्ष नेते



मुंबई : अजित पवार यांच्या बंडखोरीनंतर राज्यातील समीकरणे बदलली. उपमुख्यमंत्रीपदी अजित पवार विराजमान झाले. त्यावेळी विधानसभेतील विरोधी पक्षनेता कोण? असा प्रश्न विचारला जात होता. अखेर विरोधी पक्षनेतेपदी विजय वडेट्टीवार यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर विधानसभेत काँग्रेसचं संख्याबळ जास्त आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून कुणाला विरोधी पक्षनेतेपद दिलं जाणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. विरोधी पक्षनेते पदासाठी राष्ट्रवादीकडून विजय वडेट्टीवार आणि संग्राम थोपटे यांचं नाव चर्चेत होतं. मात्र, अखेर विजय वडेट्टीवार यांनी विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी विरोधी पक्ष नेतेपदी विजय वडेट्टीवारांच्या नावाची घोषणा केल्यानंतर सभागृहाकडून वडेट्टीवार यांचे अभिनंदन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वत: वडेट्टीवार यांना विरोधी पक्ष नेते पदाच्या खुर्चीवर आसनस्थ केले. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वडेट्टीवार यांचे अभिनंदन केले. विजय वडेट्टीवारांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंन टोला मारला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, विजय वड्डेटीवार यांचे अभिनंदन करतो. आमचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील विदर्भातील आहेत. विरोधी पक्षनेते देखील विदर्भातील आहेत. देशाच्या राष्ट्रपती देखील विदर्भाच्या सून होत्या. विजय वडेट्टीवार यांच्यावर अन्याय झाला आहे. त्यांना सुरुवातीला करायला हवं होतं पण आता शेवटच्या काळात त्यांना पद मिळालं आहे. विजय वडेट्टीवार यांना शेवटच्या काळात विरोधी पक्षनेते पद मिळते त्यानंतर तुम्ही खूप काम करता आणि सरकार आलं की तुमचा पक्ष तुम्हाला विसरून जातो. इथून पुढे असे होऊ नये हीच अपेक्षा. २०२४ साली पुन्हा आम्ही सत्तेत येणार आहोत. त्यावेळी देखील तुम्ही विरोधी पक्षनेते व्हाल.

विजय वडेट्टीवारांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंन टोला मारला आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, विजय वडेट्टीवार वर्क फ्रॉम होम करणारे नेते नाहीत.ते रस्त्यावर येऊन उतरून काम करणारे नेते आहेत. रस्त्यावर उतरून काम करायला हिंमत लागते आम्ही तेच केले. संकट आलं तर लपायचा नसतं सामोरे जायचं असते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याला सक्षम विरोधी पक्षनेते मिळाले आहेत. शासन चुकलं की त्यांना त्यांची चूक दाखवून देणं हे विरोधी पक्ष नेत्याच काम असतं.या महत्त्वाच्या पदावर दुसऱ्यांदा वडेट्टीवार बसले आहेत. त्या पदाचा मान सन्मान ते वाढवतील. विजय वड्टेटीवार यांना माईकची गरज नाही.

## ना. धों. महानोर...

रान म्हणाले महानरे..
शेतीमातीतला मोर,
शब्दांचा सुर, जाता दुर
पाखरांना लागली हुरहुर..!
साहित्याचा मळा
झाला पोरका लळा
हरवता शिवार
उदासला अटोळा..!!
माणसातला माणूस
माणुसकीसाठी जगला संपूर्ण
आता झाडांचेही ओथंबले पर्ण..
वाहताना श्रद्धांजली भावपूर्ण!!!!

-भारत सातपुते ,लातूर
(८०८७६९५०००)

# विमानतळ टी पॉईंट येथे कार अपघात; चालकाचा मृत्यू

लातूर : लातूर-बार्शी रोडवर १२ नं. पाटी विमानतळ टी पॉईंट येथे आज पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास कार पलटी होवून त्यात चालकाचा मृत्यू झाला आहे.

बाजीराव लिंबराज व्यवहारे (वय ३२) रा. गातेगाव, ता. लातूर असे मयताचे नाव आहे. ते गातेगाव येथून इरटिका कारमधून लातूरला येत होते. विमानतळ टी पॉईंटजवळ त्यांची गाडी पलटी होवून त्यात त्यांचा मृत्यू झाला. गाडीमध्ये ते एकटेच होते. शवविच्छेदन झाल्यानंतर या प्रकरणी एमआयडीसी पोलीस आकस्मात मृत्युचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करत आहेत.

## विद्यार्थ्यास विटाने मारहाण

लातूर : खासगी शिकवणीसाठी एक विद्यार्थी जात असताना गायत्रीनगर भागात एका तरूणाने त्यास विटाने व रॉडने मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे.

हा विद्यार्थी शिकवणीसाठी जात होता. तेंव्हा वाटेमध्ये अभिजीत संजय सोनकांबळे हा मधोमध उभा राहिला होता. त्यास हटकताच त्याने विटा व रॉडने मारहाण केली. ती मारहाण सोडविण्यासाठी त्या विद्यार्थ्याचा काका मध्यस्थीसाठी आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आली.



लातूर शहर महापालिकेच्यावतीने क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपायुक्त मयुरा शिंदेकर यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी जाधव, आस्थापना विभाग प्रमुख एन. के. तापडे, अभिमन्यू पाटिल, सतीश कांबळे, मदने सुधाकर, अयाचीत आदी अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## त्यांच्या मते....

▣ **मुंबई गोवा महामार्गाच्या कामावर पुस्तक लिहिता येईल.**

-नितीन गडकरी

☛ आपला राजकीय प्रवास यावर लिहिले तर ते पुस्तक अधिक गाजेल

▣ **जोपर्यंत खासदाराच्या वर्तुणकित सुधारणा होत नाही तोपर्यंत खुर्चीवर बसणार नाही.**

- लोकसभा अध्यक्ष बिर्ला

☛ खासदारांनी संसद आणि आखाडा एक समजू नये.

▣ **देवेंद्र फडणवीस यांनी संभाजी भिडेंना गुरु मानावं, त्यांचे फोटो लावावेत. मात्र आमचे गुरु हे शाहू, फुले, आंबेडकर हेच.**

- अमोल मिटकरी

☛ फडणवीस यांना चाणक्य कोण मानतय.

▣ **शरद पवार १७ ऑगस्ट पासून राज्याच्या दौऱ्यावर, बीड पासून सुरुवात.**

-एक बातमी

☛ कमी पर्जन्यमान असलेल्या मराठवाड्यासाठी आनंदाची बातमी.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारासाठी १५ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर : राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बाल विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगीरी करणाऱ्या महिला व संस्थांना दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरविण्यात येते. सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३. २०२३-२४ या वर्षासाठी पुरस्कार देण्यात येणार असून यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्थांनी १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत आपले प्रस्ताव लातूर येथील प्रशासकीय इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डी. एम. गिरी यांनी केले आहे.

राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरूप एक लाख एक रुपये रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असून या पुरस्कारासाठी महिला व बाल विकास क्षेत्रात किमान २५ वर्षाचा सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या महिला या पुरस्कारासाठी पात्र आहेत. जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, दलितमीत्र पुरस्कार अथवा सावित्रीबाई पुरस्कार प्राप्त झालेल्या महिलांना तो पुरस्कार मिळाल्याच्या पाच वर्षांपर्यंत या पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

विभागीय पुरस्काराचे स्वरूप पंचवीस हजार एक रुपये रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ आहे. महिला व बाल विकास क्षेत्रात किमान सात वर्षे कार्य असावे. नोंदणीकृत संस्थेस दलितमित्र पुरस्कार प्राप्त नसावा, संस्था राजकारणापासून अलिप्त असावी. तसेच तिचे कार्य व सेवाही पक्षातील राजकारणापासून अलिप्त असावी.

जिल्हास्तरीय पुरस्काराचे स्वरूप दहा हजार एक रुपये, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. महिला व बाल विकास क्षेत्रात किमान दहा वर्षाचा सामाजिक कार्याचा अनुभव आवश्यक आहे. दलितमित्र पुरस्कार किंवा सावित्रीबाई पुरस्कार मिळालेला महिलांना हा जिल्हास्तरीय पुरस्कार अनुज्ञेय राहणार नाही.

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करताना चारित्र्य चांगले असल्याचे, तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी तसेच त्यांनी सार्वजनिक संपत्तीचा अपहार केल्याबाबतचा गुन्हा दाखल नसल्याचे विभागीय पोलीस अधीक्षक यांचे प्रमाणपत्र, प्रस्तावधारकाची माहिती, केलेल्या कार्याचा तपशील वृत्तपत्र फोटोग्राफसह, सध्या कोणत्या पदावर कार्यरत आहे, यापूर्वी पुरस्कार मिळाला असल्यास त्याबाबतचा तपशील आदी कागदपत्रे सादर करावीत. पुरस्कारासाठी प्रस्ताव ३ प्रतीत सादर करावा.

विभागस्तरीय पुरस्कारासाठी संस्थेची माहिती व वृत्तपत्र फोटोग्राफसह कार्याचा अहवाल, सध्या कोणत्या पदावर कार्यरत आहे याबाबतची माहिती, यापूर्वी पुरस्कार मिळाला असल्यास तपशील, संस्था नोंदणी प्रमाणपत्र व घटनेची प्रत, संस्थेचे पदाधिकारी यांचे चारित्र्य चांगले असल्याचे, त्यांचेविरुध्द कोणताही फौजदारी तसेच त्यांनी सार्वजनिक संपत्तीचा अपहार केल्याबाबतचा गुन्हा दाखल नसल्याचे व संस्थेचे कार्य व संस्था राजकारणापासून अलिप्त असल्याचे विभागीय पोलीस अधिक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे. पुरस्कारासाठी प्रस्ताव ३ प्रतीत सादर करावा.

इच्छुक व्यक्ती, संस्थांना विहित नमुन्यातील अर्जासाठी तसेच अधिक माहितीसाठी लातूर येथील प्रशसकीय इमारतीमधील पहिल्या मजलावरील जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयात अथवा ०२३८२-२२१२०६ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९५०३९०५२७७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपला प्रस्ताव तीन प्रतीत १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, लातूर येथे सादर करावा, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. गिरी यांनी कळविले आहे.



# जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रामध्ये आरोग्य शिबीर संपन्न

लातूर : शाळा व अंगणवाडीतील शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी करण्यासाठी दर बुधवारी स्त्री रुग्णालय परिसरातील जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रात (डीईआयसी) आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. यामध्ये हार्मोन्ससंबंधित आजारांवर उपचार केले जातात.

२ ऑगस्ट रोजी झालेल्या आरोग्य शिबिरात संदर्भित करण्यात आलेल्या २८ बाल रुग्णांवर वेगवेगळ्या आजारांवर हार्मोन्स तज्ज्ञ डॉ. विजय ढवळे, बालरोग तज्ज्ञ डॉ. अशोक धुमाळ व वैद्यकीय अधिकारी डॉ. निशा रोकडे यांच्या पथकाने उपचार केले. डीईआयसी व्यवस्थापक नदाफ अलीम व इतर अधिकारी, कर्मचारी यांनी शिबिरास सहकार्य केले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली दरबुधवारी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक सारडा, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीधर पाठक, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. आनंद कलमे यांनी केले आहे.

# आरोग्य

## कारल्याचं रस प्या,आरोग्य आणि सौंदर्य मिळवा



लोकं आपल्या वाढत्या वजनामुळे काळजीत असतात. खाण्या-पिण्यात बदल,व्यायामाचा अभाव असणं याचे कारणे असू शकतात.वजन कमी करण्यासाठी अनेक उपाय करतो,जेणे करून वजन नियंत्रित राहील.कारल्याचं रस आपल्या या समस्येला कमी करू शकतो. कारल्याचं रस किंवा ज्यूस आपल्या वजनाला कमी करण्यात आपली मदत करू शकतो.या व्यतिरिक्त त्याचे अनेक फायदे आहेत.चला तर मग जाणून घेऊ या. दररोज कारल्याचं रस प्यायल्यानं जुन्या खोकल्यापासून आराम मिळतो.कारलं दमा आणि फुफ्फुसांच्या संक्रमणाच्या उपचारासाठी प्रभावी आहे. कारल्याचं रस मधुमेहाच्या रोगासाठी देखील फायदेशीर आहे. चेहऱ्यावर चमक आणण्याचे काम देखील कारल्याचं रस करतो.जर आपण याचे नियमित सेवन करता,तर कारलं शरीरात रक्त शुद्ध करण्याचे काम करतो. त्वचेला उजळतो, मुरूम, पुळ्या, पुटकुळ्या इत्यादी समस्यां नाहीशी करतो.

## वजन वाढविण्यासाठी खजूर खाणे आहे फायद्याचं

खजूरा मध्ये खूप पोषक तत्व असतात, खजूर हे शरीरासाठी चांगले असते, त्यामुळे लोक खजूर आवडीने खातात. आपल्या शरीराला रोजची गरजेची असलेली पोषकतत्वे मिळत असल्याने खजूराला पूर्ण अन्न म्हटले जाते. त्यामुळे खजूर शक्तीवर्धक, अशक्तपणा कमी करणारं आणि शरीराला ऊर्जा देणारं फळ आहे. खजूर खाल्ल्यास तुम्हाला तात्काळ उर्जा मिळते. आयुर्वेदानुसार खजूर शक्तीवर्धक, पौष्टिक, श्रमहारक आणि वीर्यवर्धक फळ आहे.

खजूरामध्ये असलेले पोषक तत्व :- खजूरा मध्ये विविधप्रकारचे जीवनसत्वे असतात. तसेच खनिजे, फायबर, तेल, कॅल्शियम, सल्फर, पोटाशियम, पोस्फोरास, मॅग्नीस, कॉपर आणि मॅग्निशिम यांसारखे तत्व असतात, हे तत्व आपल्या आरोग्यासाठी व शरीरासाठी उपयोगी असतात.

बद्धकोष्ठतेच पासून बचाव :- बऱ्याच जणांना बद्धकोष्ठतेचा त्रास असतो, त्यांच्यासाठी खजूर हे एक प्रकारे वरदान आहे. खजूर रात्रभर पाण्यात भिजून ठेऊन ते सकाळी खाल्याने त्याचा आपल्याला चांगला लाभ होतो, खजूरामध्ये सॉयुबल फाइबर असतात यामुळे हे बद्धकोष्ठतेवर खूप फायदेमंद असतात.

वजन वाढवण्यासाठी उपयोगी :- आपल्याला आपले वजन वाढवायचे असतील तर खजूर हे खूप फायदेमंद



ठरतात, खजूरामध्ये प्रोटीन, विटामीन्स तत्व व शुगर असते, १ किलो खजूरामध्ये ३००० कॅलरीस असतात, खजूर रोज नियमितपणे खाल्याने आपल्याला याचे फायदे होतील.

कॅन्सर पासून बचावः- कॅन्सर सारखा आजार मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि कॅन्सर ला आटोक्यात आण्यासाठी अनेक संशोधन हि केले जात आहेत. एका संशोधनात असे आढळून आले आहे कि खजूर खाल्याने पोटाचा कॅन्सर होण्याचा चा धोका तसेच त्याचा प्रभाव कमी होतो. खजूर हा सगळ्यांसाठी लाभदायी आहे त्याचे कोणतेही दुष्परिणाम नसतात, म्हणून आपण खजुराचे रोज सेवन करा, यामुळे आपल्याला खूप फायदे होतील.

हृद्या संबंधी होणाऱ्या आजारांसाठी फायदेमंद :- खजूर रात्रभर पाण्यात भिजऊन ठेवा व सकाळी भिजवलेला खजूराचा चुरा करून खा, हे हृदयासाठी उपयोगी आहे. याच्यात पोट्याशियम असते, हे हृदय झटका व इतर हृदय संबंधी होणाऱ्या आजारांचा धोका कमी करतो. खजूर खाल्याने आपला कोलेस्ट्रेल नियंत्रित राहते.

अशक्तपणा दूर होतो :- अशक्तपणा खास करून महिलां मध्ये आढळते. ज्या लोकांना अशक्तपणा असतो ते लोक रक्त दान करू शकत नाहीत. ज्या लोकांना अशक्तपणा असतो त्यांच्या साठी खजूर खूप फायदेमंद आहे, खजूरामध्ये आयन मोठ्या प्रमाणात असतात. खजूर खाल्याने रक्तातील हिमोग्लोबिनचे स्थर सुधारते. खजूर खाल्याने आपल्याला ऊर्जा मिळते, शक्ती मिळते, यामुळे थकावट व सुस्थी दूर होते. खजुराचे फायदे तसेच इतर आजारांवर गुणकारी

खजूर रोज खाल्याने आपल्याला हाडांसंबंधी त्रास होणार नाही, यामुळे हाडे मजबूत होतात.

नियमित पणे खजूर खाल्याने कोणत्याही प्रकारची एलर्जी होत नाही.खजूर खाल्याने आपल्याला ताजेतवाने वाटते, आपल्याला ऊर्जा मिळते.

## दुधात बडीशेप मिसळल्यास दम्यापासून मिळेल आराम

बडीशेपमध्ये जीवनसत्त्वे, फायबर, लोह, पोटॅशियम, अँटी-ऑक्सिडेंट, अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. बडीशेप खाणे चांगले आहे जर विशेषत: पोटाची समस्या असेल तर. पण, हे दुधात मिसळल्यास आरोग्यास दुप्पट फायदा होतो. बडीशेप आणि दुधाच्या फायद्यांविषयी जाणून घ्या

ते तयार करण्यासाठी १ ग्लास दुधात १ चमचा बडीशेप मिसळा आणि उकळवा. आपण त्यात साखर किंवा मध देखील घालू शकता.

**बडीशेप दूध पिण्याचे फायदे**

**दम्याचा रुग्णांना फायदा**

ॲन्टी-बॅक्टेरियल, अँटी-व्हायरल गुणधर्मानी समृद्ध असलेले बडीशेप चे दूध दमाच्या रुग्णांनी सेवन केलेच पाहिजे. हे दम्याचा प्रतिकार करण्यास आणि त्याची लक्षणे कमी करण्यास मदत करते.

**मधुमेह नियंत्रित करते**

मधुमेह नियंत्रित करण्यासाठी बडीशेपचे दूध पिणे खूप फायदेशीर आहे. मधुमेह रुग्णांनी त्यास आपल्या आहारात समाविष्ट केले पाहिजे.

**हृदय निरोगी राहते**


बडीशेपमध्ये जीवनसत्त्वे, कॅल्शियम, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अँटी-ऑक्सिडेंट गुणधर्म असतात. हे कोलेस्ट्रॉलद्वारे नियंत्रित होते. यामुळे

हृदय निरोगी असल्यास, त्यास संबंधित आजार होण्याचा धोका कमी होतो.

**पोटाशी संबंधित समस्या दूर होतात**

त्याचे सेवन केल्याने पचन क्रिया मजबूत होते. बद्धकोष्ठता, पोटदुखी, जळजळ,पित्त, सूज, अपचन इत्यादीपासून आराम मिळेल. मसालेदार आणि तळलेले अन्न खाल्ल्याने अपचन आणि पित्त होते. अशा वेळी त्याचे सेवन करणे फायदेशीर ठरेल.

**वजन कमी होते**



आज जगातील बहुतेक लोक त्यांच्या वाढलेल्या वजनाने नाराज आहेत. यामुळे मेटाबॉलिज्म वाढत जाते आणि कॅलरी जळण्यास मदत होते, तसेच दुधाचे सेवन केल्याने पोट बर्याच काळासाठी भरलेले राहते. याशिवाय वजन कमी करण्यासाठी रोज १ चमचा बडीशेप खाणे देखील फायदेशीर आहे. एका संशोधनानुसार महिलांनी कॅलरी कमी करण्यासाठी दुपारच्या जेवणापूर्वी हे दूध सेवन केले पाहिजे.

**चांगली झोप येते**

आजकाल प्रत्येकजण कामाच्या दबावामुळे चिंतेत पडलेला आहे. बऱ्याच लोकांना यामुळे निद्रानाश होतो. परंतु बडीशेपमध्ये असलेले मॅग्नेशियम मन शांत करण्यास आणि चांगली झोप घेण्यास मदत करते.

**दृष्टी वाढते**

डोळ्यांची दृष्टी वाढविण्यासाठी बडीशेप खूप प्रभावी आहे. त्यात व्हिटॅमिन ए असल्यामुळे डोळ्यांच्या वाढत्या दृष्टीबरोबर मोतीबिंदू सुधारण्यास मदत होते.

**रक्त वाढते**

याच्या सेवनाने रक्ताचे शुद्धीकरण होऊन ते वाढण्यास मदत होते.

## मधुमेह कमी करण्यास फायदेशीर ठरतो आरोग्यवर्धक कडीपत्ता

कडीपत्ता ही एक सुगंधी भाजीपाला असून त्याचा पाला चमकदार, हिरवागार आहे, याच्या पानांवरून नुसता हात फिरवला तरी हाताला त्याचा सुगंध येतो एवढा सुवासिक आहे. याच्या पानांमध्ये तेलाचे प्रमाण (उडणद्रव्य) अधिक प्रमाणात आहे. सुगंधा कढीपत्त्यात हरितद्रव्य अधिक असल्याने लोह, चुना, 'क' आणि 'अ' जीवनसत्त्व,तसेच आयोडिनचे प्रमाण अधिक प्रमाणात आहे.

कढीपत्त्याने कर्करोग होत नाही. मधुमेहाने प्रमाण कमी होते. कोलेस्टोरॉलचे प्रमाण कमी होते. कडीपत्त्याच्या पानात फायबर असल्याने कॅन्सरला प्रतिबंध होतो.कडीपत्ता हा फार गुणकारी असतो. तो काही भाजी आणि आमटीला चांगला वास देण्यापुरता उपयोगाचा नाही. त्याचे अनेक औषधी गुणधर्म आहेत. पण भाजी आमटी खाताना आपण त्याला बाहेर काढून टाकतो म्हणजे त्याच्या औषधी गुणधर्माला आपण मुकतो. म्हणून आयुर्वेदात भाजी आणि आमटीत टाकण्यात आलेला कडीपत्ता काढून न टाकता चावून खाल्ला पाहिजे असे सांगण्यात आले आहे. तसा तो खाल्ला तरच त्याचा औषधी उपयोग आपल्याला होईल. या कडीपाल्याचे अनेक गुणधर्म आहेत. तो पित्तनाशक आहे. कडीपत्ता खाल्ल्याने पित्त कमी होते आणि पचनाचे प्रश्न सुटतात. अर्थात कडीपत्ता केवळ आहे तसाच खल्ला तर अनेक उपयोग आहेतच पण त्याचा काढा करून किंवा त्याला अन्य औषधात मिसळून खाल्ल्यासही त्याचे अनेक लाभ आहेत.

मसाला म्हणून सामान्यतः वापरली जाणारी ही पाने प्रत्येक डिशमध्ये एक खास चव घालते. पण नुसत्या कढीपत्त्यावर फक्त चव नसण्यापेक्षा बरेच काही आहे. कर्बोदकांमधे, फायबर, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन ई, कढीपत्तांमुळे आपल्या हृदयाच्या कार्यक्षमतेस मदत होते.

औषधी गुणधर्म : अशक्तपणा कमी ठेवण्यास मदत होते : कढीपत्ता लोह आणि फॉलिक ऍसिडचा समृद्ध स्रोत आहे. फॉलिक ऍसिडस् मुख्यत्वे शरीराला लोह शोषून घेण्यास आणि मदत करण्यास जबाबदार असते आणि कडी पत्ता हा दोन्ही संयुगेचा समृद्ध स्रोत असल्याने अशक्तपणा कमी करण्याचा मदत होती.

मधुमेह कमी करण्यास फायदेशीर ठरतो: कढीपत्त्यामुळे शरीरातील इन्सुलिन क्रियाकलापांवर परिणाम होऊन आपल्या रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि रक्तातील साखरेची पातळी कमी होते. तसेच पानांमध्ये असलेल्या फायबरचा प्रकार आणि मात्रा रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

कढीपत्त्याची पचन सुधारण्यास आणि आपल्या शरीरात चरबी शोषण्याच्या पद्धतीत बदल करण्यासाठी आणि त्याद्वारे वजन कमी करण्यास मदत करण्यासाठी ओळखले जाते.



रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करते: कढीपत्त्यामुळे कोलेस्ट्रॉलचे ऑक्सिडेशन रोखते जे एलडीएल कोलेस्ट्रॉल (खराब कोलेस्ट्रॉल) बनवते. हे यामधून चांगले कोलेस्ट्रॉल (एचडीएल) चे प्रमाण वाढविण्यात मदत करते आणि हृदयरोग आणि एथेरोस्क्लेरोसिससारख्या परिस्थितीपासून आपल्या शरीराचे संरक्षण करते.

केसावर आजारावर फायदेशीर : खराब झालेले केसांवर उपचार करणे, पातळ केसांचा शाफ्ट बळकट करणे, केस गळणे आणि कोंडा हाताळणे हे देखील कडीपत्ता खूप प्रभाव ठरतो .

कढीपत्त्याचा डोळा दृष्टीक्षेपावर फायदेशीर परिणाम होतो : लवकर मोतीबिंदू होण्यापासून रोखतात. मुख्यत: कढीपत्त्यामध्ये व्हिटॅमिन ए भरपूर प्रमाणात असते.

स्मरणशक्ती सुधारन्यास मदत होते : आपल्या आहारात कढीपत्ता एकत्र केल्याने आपल्या स्मरणशक्तीवर फायदेशीर परिणाम होतो. हे अल्झायमर सारख्या क्षीण स्मृती विकारांवर कार्य करण्यास मदत करू शकते.

कडिपत्याने केस लांब आणि दाट होतात.

शरीराची कातडी तजेलदार होते. पण आपल्याला चमचमीत खाल्ल्यानंतर अपचन झाले असेल किंवा त्यावर कडीपाल्याचा काढा प्यावा.

भाजी-आमटीतील कडीपत्ता आवडत नसेल तर तुम्ही कडीपत्त्याचा चहा देखील बनवू शकता. मग सकाळी चहा-कॉफी ऐवजी तुम्ही कडीपत्त्याचा चहा घेऊ शकता. त्याचा मेंदूला अधिक फायदा होईल.

तात्पर्य : कढीपत्त्याची पाने विविध पदार्थांमध्ये वापरली जातात. त्यामुळे जेव्हा भाव नसेल अथवा भाव. असले तरीही कायमस्वरूपी त्यापासून दर्जेदार असे उत्पादन मिळण्याचे दृष्टीने या काडिपत्यावर योग्य प्रकिया करून ते देशभरातील शहरी मार्केटमध्ये विकली गेली तर ज्यामुळे उत्पादकांना अधिक परतावा मिळेल आणि ग्राहकांना फायदेशीर ठरतील.

## पोट साफ करण्यासाठी संत्र्याची साल आहे उपयोगी



उन्हाळ्यात अनेक फळे खाल्ल्याने आपल्याला फायदा होत असतो. या फळांपैकी एक फळ म्हणजे संत्रा. आज आपण या लेखात संत्रा या फळाचे फायदे जाणून घेणार आहोत.

संत्रा हे एक एक शक्तीवर्धक फळ आहे. संत्र्याचा एक ग्लास रस शरीर आणि मन थंड करते, थकवा आणि तणाव दूर करते, हृदय आणि मेंदूला नवीन जोम आणि ताजेपणा देते. संत्र अनेक विकारांवर रामबाण उपाय आहे.संत्र्याचं सेवन केल्यानं. थंडीपासून बचाव होईल. संत्रामध्ये असलेले व्हिटॅमिन सी सर्दी दूर ठेवण्यास मदत करते. असेही म्हणतात की सर्दी झाल्यावर हे फळ खावे,

यासोबत कोरडा खोकला दूर करण्यासदेखील संत्री मदत करते.

संत्र हे ओला खोकला असलेल्या कफला पातळ करुन बाहेर काढते.

संत्र्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्व 'क', लोह आणि पोटॅशियम असतं.

संत्र्याची सर्वात मोठी विशेषता म्हणजे यामध्ये फ्रुक्टोज, डेक्स्ट्रोज, खनिज आणि व्हिटॅमिन्स असतात आणि हे शरीराला लगेच ऊर्जा देण्याचे काम करते.

संत्र्याचा एक ग्लास रस संपुर्ण शरिराला रिलॅक्स करतो. यामुळं आपला तणाव आणि थकवा दूर होतो.

पोट साफ न होण्याची समस्या असेल तर संत्र्याच्या रसामध्ये बकरीचे दूध मिसळुन प्यायल्यास खुप फायदा मिळतो.

संत्र्याचे नियमित सेवन केल्याने मूळव्याधाची समस्या दूर होते. रक्तस्राव थांबवण्याची क्षमता यामध्ये आहे.

खुप ताप असेल तर रुग्णाला संत्र्याचा रस दिल्याने तापमान कमी होते. यात असलेले सायट्रिक आम्ल हे मूत्र रोग आणि किडनीच्या आजारांना दूर करते.

हृदयरोग असलेल्या लोकांना संत्र्याच्या ज्यूसमध्ये मध टाकून दिल्याने आश्र्चर्यकारक फायदे दिसून येतात.

संत्र्याचे नियमित सेवन केल्याने दात आणि हिरड्या चांगल्या राहतात. दात पांढरे होतात आणि तोंडातून दुर्गंधी येण्याची समस्या दूर होते.

संत्र्यामध्ये अँटीऑक्सीडंट्स अधिक प्रमाणात असतात जे कॅंसरच्या प्रभावाला नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. कॅंसरपासुन बचाव करण्यासाठी नियमित संत्र्याचा ज्यूस प्यायल्याने फायदा होतो.

पोटातील गॅस, अपचन, जॉइंट पेन, उच्च रक्तदाब या रोगांसाठी हे रामबाण उपाय आहे.

गरोदर महिला किंवा यकृतचा रोग झालेल्या महिलांसाठी संत्र्याचा ज्यूस खुप फायदेशीर असतो.

गरोदर काळात याचं नियमित सेवन केल्यानं प्रसव वेदनांत आराम मिळतो. यासोबतच बाळाचं आरोग्य खुप चांगलं राहतं.

संत्र्याची साल वाळवून त्याचे चूर्ण तयार करा आणि हे चूर्ण गुलाब जल किंवा दूधात टाकुन चेहऱ्याला लावल्यानं चेहरा स्वच्छ होतो आणि पिंपल्स दूर होतात. ब्लॅकहेड्स आणि सावळेपणा दूर होतो.

संत्र्याचं ताजं फूल बारीक करुन त्याचा रस केसांना लावल्यानं केसांची चमक वाढून केस काळे आणि घनदाट होतात.

## तुम्हाला सांधेदुखी आहे का ? मग शेवगा तुमच्यासाठी फायद्याचा

शेवग्याचे मूळ, फूल, पाने व साल यांचा वापर आयुर्वेदिक औषधात केला जातो.शेवगा हा उष्ण गुणाचा तसेच कफनाशक आहे. प्रक्रिया उद्योगाच्यादृष्टीने आरोग्यदायी शेवग्याची मागणी वाढत आहे.

शेवग्याच्या पानांची भाजी व फुलांची कोशिंबीर करतात. शेवग्याच्या शेंगात व पानात अ आणि क ही जीवनसत्वे तसेच चुना (कॅल्शिअम), लोह व प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात. वाळलेल्या शेवग्याच्या शेंगांतील बियांपासून तेल काढतात. या तेलाचा उपयोग सांधेदुखीवर होतो. पिण्याचे पाणी स्वच्छ करण्याकरिता शेवग्याच्या शेंगांतील बियांची पावडर अत्यंत उपयुक्त आहे. शेवगा हा उष्ण गुणाचा आहे. त्याचप्रमाणे तो कफनाशक आहे.

**औषधी गुणधर्म**

पानांचे पोटीस गळूवर लावले असता ते पिकून निचरा होण्यास मदत होते.

संधिवात आणि आमवातामध्ये बियांचे तेल वापरतात.

शेवग्यामुळे पोटातील विविध कृमी, जंतांचा नाश होतो.

भूक मंदावली असल्यास शेवग्याची भाजी खाल्ल्याने भूक वाढण्यास मदत होते.

तोंडाला चव नसेल तर त्याच्या सेवनाने त्यात असलेले क्षार जिभेच्या ठिकाणी असलेला दूषित कफ कमी करतात. जिभेचे शोधन करतात, अरुची कमी होते.

शेवगा हा उष्ण गुणांचा असल्याने पित्त प्रकृतीच्या लोकांनी योग्य प्रमाणातच खावा.

यकृत व प्लीहेच्या आजारात उपयुक्त आहे. त्यामुळे प्लीहोदरमध्ये याचा काढा उपयुक्त आहे.

कफयुक्त सर्दी-खोकला व त्यामुळे होणाऱ्या डोकेदुखीत शेवग्याच्या बियांचे चूर्ण नस्य म्हणून वापरावे.



शेवगा हृदयाला बळ देणारा आहे. हृदयदौर्बल्य असणाऱ्यांनी याचा उपयोग आहारात करावा.

शेवगा हा मेद कमी करणारा आहे. स्थौल्यनाशासाठी अनेक मेदोहर औषधात शेवग्याचा वापर केला जातो.

नेत्र रोगात शेवग्याचा वापर प्रामुख्याने केला जातो.

डोळ्यांची ताकद वाढवण्यासाठी व मोतीबिंदूच्या उपचारात पानांचा रस वापरतात. शेवग्याच्या बियांचे अंजन केल्याने डोळ्यांचे सर्व कफविकार कमी होतात.

नारुरोगामध्ये नारुवर शेवग्याची साल किंवा पाने आणि सौंधवाचा लेप केला असता नारू बाहेर पडतो.

मूतखड्यावर शेवग्याच्या मुळांचा काढा उपयोगी आहे.

मासिक पाळीमध्ये होणाऱ्या पोटदुखीसाठी आणि रक्तस्राव कमी होत असेल , तर शेवग्याची भाजी, काढा उपयोगी आहे.

कुपोषणाने होणारे बालमृत्यू, लोहाच्या कमतरतेमुळे पौगंडावस्थेतील मुली, लहान मुले, गर्भिणी महिला यांच्यातील आजार शेवग्यामुळे कमी होण्यास मदत होते.

अस्थीदौर्बल्य, रक्तक्षय, धातूक्षय, अशक्तपणा यावर शेवगा उपयुक्त आहे.

शेवग्यात लोह, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम, झिंक भरपूर प्रमाणात आढळते.

प्रथिने, कर्बोदके, अ आणि क जीवनसत्त्व, बी. कॉम्प्लेक्सचा उत्तम स्रोत शेवग्यात आढळतो. शेवग्यात मोरींजीन नामक क्षारतत्व आहे, तसेच प्रतिजैविक आहे. त्यामुळे उत्तम जंतुघ्न असलेला शेवगा पाणी शुद्धीकरणासाठी वापरतात. बीजचूर्णाचा वापर पाणी स्वच्छ करण्यासाठी करतात.

## लातूरच्या मार्केट यार्डात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन व रक्तदान शिबीर

लातूर : लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती आणि महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन लातूर जिल्हा शाखेच्या संयुक्त विद्यमाने साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. प्रारंभी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे,उपसभापती सुनील पडिले,माजी सभापती ललीतभाई शहा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष घोडके,संचालक बालाप्रसाद बिदादा, संचालक सुधीर गोजमगुंडे, संचालक शिवाजी कांबळे,अशोक अग्रवाल,सचिव सतीश भोसले,सचिव भास्कर शिंदे,आडत असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील,राष्ट्रीय गुमास्ताचे अध्यक्ष तुळशीराम गंभीर आदी उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.३ ऑगस्ट २०२३ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य आर.एच.लड्डा यांनी संयुक्तरित्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रभावी व्यक्तिमत्व,क्रांतिकारक,देशभक्त आणि झुंजार नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

यावेळी पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,डॉ.नंदिनी कोरडे,डॉ.श्रेयस माहुरकर,विष्णू नाईकवाडे,सुजित अपसिंगेकर,किशोर जाधव,संतोष सूर्यवंशी,सुदाम सातपुते,मोहसीन शेख,शेषराव बिराजदार,बालू चौगुले,बाबासाहेब बचाटे,शर्मा,अमोल क्षिरसागर,प्रशांत खुब्बा यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नवमाध्यमांचा वापर तरूणांनी स्वत:च्या विकासासाठी करावा-जिल्हाधिकारी



लातूर : संवादाच्या नवतंत्रज्ञानाचा वापर माहिती आणि ज्ञानासाठी होणे गरजेचे आहे. तुम्ही फक्त व्हाट्सअप आणि फेसबुकसाठी त्याचा वापर करत असाल तर त्याचा अर्थ नव्या तंत्रज्ञानाचा वापर दुर्दैवाने तुमच्या भल्यासाठी करत नाही असा होतो. नवसंवादमाध्यम तुम्हाला अधिक फोकस होण्यासाठी मदत करणारे आहेत, त्यामुळे त्यांचा वापर तुमच्या विकासासाठी करा, असा मोलाचा सल्ला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिला.

लातूर तहसील कार्यालयामार्फत महसूल सप्ताह निमित्त 'युवा – संवाद' कार्यक्रमाचे दयानंद कला महाविद्यालयात आयोजन केले होते. या कार्यक्रमात जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी निवडणूक उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे, प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना शासनाचे कागदपत्रे खूप महत्वाची ठरतात. ते सर्व कागदपत्रे तुम्हाला तुमच्या हातात मिळावेत आणि तुमच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात म्हणून 'युवा संवाद' हा कार्यक्रम ठेवला आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि त्यांची टीम इथे आहे. त्यामुळे याचा अधिकाधिक लाभ घ्या, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांनी विद्यार्थ्यांना केले.

चाकोरीबद्ध विचार न करता चाकोरीच्या बाहेरचा विचार करा. खूप वाचन करा, त्यातून नवी दृष्टी मिळते. करियर करताना दोन पर्याय ठेवा. त्यातला पहिला पर्याय तुम्हाला मनातून वाटतं त्या क्षेत्रासाठी प्रयत्न करा. त्यात यश नाहीच आलं तर दुसरा जो हमखास पर्याय असेल तो हातात ठेवा, असा मोलाचा सल्ला जिल्हाधिकारी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नालाही जिल्हाधिकारी यांनी मोकळेपणाने उत्तर देत हा संवाद अधिक आनंददायी केला.

आज जो युवा-संवाद कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यात विद्यार्थ्यांना कोणत्या कागदपत्राची गरज आहे. याची नोंदणी करून सात दिवसात त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे दिली जातील, अशी माहिती लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे यांनी प्रास्ताविकात दिली. यावेळी काही विद्यार्थी, विद्यार्थ्यांनीना प्रतिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार डॉ. दिलीप नागरगोजे यांनी मानले.

## गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेसाठी १८ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर : राज्यस्तरीय योजने अंतर्गत सुरु असलेली गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही नवीन सुधारीत योजना सुरु करण्याबाबत प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गोशाळांनी ३ ऑगस्ट २०२३ ते १८ ऑगस्ट २०२३ या कालावधीत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत निवडण्यात येणाऱ्या गोशाळेस त्यांच्याकडे असलेल्या पशुधन संख्येनुसार अनुदान दोन टप्प्यात देण्यात येणार आहे. गोशाळेत ५० ते १०० पशुधन असल्यास १५ लाख रुपये, १०१ ते २०० पशुधन असल्यास २० लाख रुपये आणि २०० पेक्षा जास्त पशुधन असल्यास २५ लाख रुपये अनुदान देण्यात येईल. पहिल्या टप्प्यात ६० टक्के, तर दुसऱ्या टप्प्यात ४० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, मार्गदर्शक सूचना, अर्ज करण्याची पद्धत याविषयीची माहिती पंचायत समितीमधील पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. या क्षेत्रामध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्रासह अर्ज करावेत, असे आवाहन डॉ. कदम यांनी केले आहे.

# देवणी येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

उदगीर : देवणी येथील लोकजागृती शिक्षण संस्थेचे सचिव, भाऊसाहेब सहकारी बँकेचे चेअरमन तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.



भाऊसाहेब सहकारी बँक व उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरात २२४ रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात येऊन १२२ जणांवर नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच लोकजागृती शिक्षण संस्थेतील तीन हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नेत्र शिबीरासाठी नेत्रतज्ञ प्रमोद जमादार, डॉ. सचिन निलंकर, पीआरओ गणेश मुंडे, कॉन्सलर सुरेश तिवारी, योगेश भालेराव, श्रीकांत सावंत यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. रामप्रसाद लखोटिया, प्रशांत पाटील जवळगेकर, दिलीप मजगे देवणीकर, सदाशिव पाटील तळेगावकर, डॉ. एल.एम. कुलकर्णी, वसंतराव सोनकांबळे, अण्णाराव पाटील, नामदेवराव पाटील, व्यंकटराव काळे, शंकरराव पाटील तळेगावकर, प्रा. किशनराव हरमुंजे, उत्तरा कलबुर्गे, मनोज पुदाले, सुधाकर मांगुळकर, ॲड. दत्ताजी पाटील, बाबुराव बिरादार, शांतीनाथ ढगे, व्यंकटराव पाटील अवलकोंडेकर, कोमल बिरादार नागोराव भोसले, गोपीनाथ सगर, दिनेश पाटील, ईश्वर खटके, संभाजी पाटील तळेगावकर, रविंद्र हसरगुंडे, विजयकुमार पारसेवार, बाबुराव इंगोले, रामराव राठोड, डॉ. शंकरप्पा मजगे, काशिनाथ गरिबे, मनोहर पटणे, अशोक लुल्ले, रमेश कोतवाल, बशीर पठाण, व्यंकटराव पाटील लासोनकर, मल्लिकार्जुन डोंगरे यांच्यासह डी.व्ही. राजे, प्राचार्य एम.बी. मांजीबाळे, बी.व्ही. पाटील डिग्गीकर, मुख्याध्यापक तानाजी पाटील तळेगावकर, आर.के. बिरादार, विनायक पाटील, दत्ता अचवलकर, प्रा. सलीम मुंजेवार, नंदकुमार पटवारी, सुधीर नाबदे, डी.एन. कांबळे, मच्छिंद्रनाथ दारनुळे, शिवाजीराव पाटील, सुमंत बिरादार, बी.एल. पाटील, सरपंच सतीश पाटे, चेअरमन अविनाश पाटील, अनिल निडवंचे तळेगावकर तसेच बँकेचे अधिकारी एस. एस. पाटील, शिवाजी पाटील तळेगावकर, सर्व शाखाधिकारी यांची उपस्थिती होती.


## टी. सी. हरवली आहे

शरद सिताराम जाधव या नावाची राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालय (बी.एड्), लातूर येथून बी.एड् उत्तीर्ण झाल्याची टी. सी. विवेकानंद चौक ते गांधी चौक दरम्यान प्रवास करत असताना हरवली आहे. तरी कोणास मिळून आल्यास त्यांनी खालील मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा.

संपर्क : मो. क्र. ७९७२९२८५५०

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **SAYYAD JAFAR MADARSAB TO : JAFARMIYA MADARSAB SAYYAD** HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **JAFARMIYA MADARSAB SAYYAD** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME : -SAYYAD JAFAR MADARSAB**
**NEW NAME :-JAFARMIYA MADARSAB SAYYAD**
**ADDRESS :-KHORI GALLI OPP ARABI MADARSA AYESHA COLONY LATUR**

## CHANGE OF NAME

I have Change my name from **RACHATTE PRATHMESH CHANDRAKANT TO RACHATTE PRATHAMESH CHANDRASHEKHAR** hence for this declaration in future I will use this name **RACHATTE PRATHAMESH CHANDRASHEKHAR** in future the same name will be used by my children & wife.

**OLD NAME :- RACHATTE PRATHMESH CHANDRAKANT**
**NEW NAME :- RACHATTE PRATHAMESH CHANDRASHEKHAR**
**ADDRESS :- Karanje Galli, Ausa, Tq. Ausa, Dist- Latur 413520**

## Change Of Name

I have Change my Name Old Passport **Sneha Nandkishor Papruniya To Sneha Nandkishor Paprunia**

Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Sneha Nandkishor Paprunia** in future the same name will be used by me and my all family.

**Old Name :- Sneha Nandkishor Papruniya**
**New Name :- Sneha Nandkishor Paprunia**
**Add:-** Laxmi Dham, More Nagar, Latur.

## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **PATIL UMESH TO : PATIL UMESH MANIKRAO** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE PATIL UMESH MANIKRAO IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- PATIL UMESH**
**NEW NAME :- PATIL UMESH MANIKRAO**
**ADDRESS :- SAI NAGAR UDGIR DIST.LATUR MS**

## CHANGE OF NAME

I have Change my name from **RACHATTE CHANDRAKANT VIRBHADRAPPA TO RACHATTE CHANDRASHEKHAR VIRBHADRAPPA** hence for this declaration in future I will use this name **RACHATTE CHANDRASHEKHAR VIRBHADRAPPA** in future the same name will be used by my children & wife.

**OLD NAME :- RACHATTE CHANDRAKANT VIRBHADRAPPA**
**NEW NAME :- RACHATTE CHANDRASHEKHAR VIRBHADRAPPA**
**ADDRESS :- Karanje Galli, Ausa, Tq. Ausa, Dist- Latur 413520**

## पासपोर्ट व महत्वाची कागदपत्रे हरवली आहेत

सय्यद अयमन बदरूलहक्क च्या नावे दि.१३/७/२०२३ रोजी पासपोर्ट काढला होता. परंतू सदर पासपोर्ट तसेच १० वी मार्कमेमो व १२ वी मार्कमेमो माझ्याकडून दि.२१/०७/२०२३ रोजी अंबाजोगाई रोड ते शिवाजी नगर, लातूर यादरम्यान हरवले आहे. पासपोर्ट क्र. X6315481 असा आहे तसेच फाईल नं. PND 078100671223 असा आहे. १२ वी मार्कमेमो बै. क्र. T042700 व १० वी चा मार्कमेमो बै. क्र. L000562 सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

: संपर्क :
मो. क्र. ८०१०१५५५६९

## Change Of Name

I have Change my Son's education certifacate Name **Mitkari Swarna To Mitkari Suvarna**

Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use **Mitkari Suvarna** in future the same name will be used by me and my all family.

**Old Name :- Mitkari Swarna**
**New Name :- Mitkari Suvarna.**
**Add:-** Siddheshwar Nagar, Ausa.


## ग्रामपंचायत कार्यालय, साखरा
### ता.जि. लातूर
**जाहिर प्रगटन**

मौजे साखरा, ता.जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रतीक अशोकराव चिंचोले, रा. विशाल नगर, लातूर, ता.जि. लातूर यांची जागा/ घरे नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दिनांक ०२/०८/२०२३ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

**नोंदणी क्र. ३२७/२०२३ दिनांक १०/०१/२०२३**
**सदर जागेची/ घराची चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.**
पु.- गट नं. ५५/१ मधील उर्वरीत जमीन प.- १२ मीटर रूंदीचा रस्ता
द.- प्लॉट नं. ६ उ.- प्लॉट नं. ४

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| गट नं. ५५/१ पैकी प्लॉट नं. ५ पूर्ण | लांबी- पू.प. १८.२९ मी. रुंदी- द.उ. १५.२४ मी. एकुण क्षेत्रफळ २७८.७३ चौ. मी. | प्रतीक अशोकराव चिंचोले रा. विशाल नगर, लातूर | लक्ष्मीकांत बापूराव माचिले, रा. अंबाजोगाई रोड, लातूर |

किंमत : २,००,०००/-

सदरील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. कार्यालयाला लेखी तक्रार अर्ज करावा.

मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**
ग्रामपंचायत साखरा
ता.जि. लातूर

## ग्रामपंचायत कार्यालय, साखरा
### ता.जि. लातूर
**जाहिर प्रगटन**

मौजे साखरा, ता.जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, शुभम अशोकराव चिंचोले, रा. विशाल नगर, लातूर, ता.जि. लातूर यांची जागा/ घरे नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दिनांक ०२/०८/२०२३ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

**नोंदणी क्र.११५१७/२०२२ दिनांक १३/१२/२०२२**
**सदर जागेची/ घराची चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.**
पु.- गट नं. ५४ मधील जमीन प.- १२ मीटर रूंदीचा रस्ता
द.- प्लॉट नं. ५ उ.- प्लॉट नं. ३

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| गट नं. ५५/१ पैकी प्लॉट नं. ४ पूर्ण | लांबी- पू.प. १८.२९ मी. रुंदी- द.उ. १५.२४ मी. एकुण क्षेत्रफळ २७८.७३ चौ. मी. | शुभम अशोकराव चिंचोले रा. विशाल नगर, लातूर | लक्ष्मीकांत बापूराव माचिले, रा. अंबाजोगाई रोड, लातूर |

किंमत : २,००,०००/-

सदरील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. कार्यालयाला लेखी तक्रार अर्ज करावा.

मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**
ग्रामपंचायत साखरा
ता.जि. लातूर

## ग्रामपंचायत कार्यालय, साखरा
### ता.जि. लातूर
**जाहिर प्रगटन**

मौजे साखरा, ता.जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रियंका विवेकचंद्र आव्हाड, रा. कपूर गल्ली, जालना यांची जागा/ घरे नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दिनांक ०२/०८/२०२३ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

**नोंदणी क्र.१५१३/२०२३ दिनांक १३/०२/२०२३**
**सदर जागेची/ घराची चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.**
पु.- गट नं. ५४ मधील उर्वरीत जमीन प.- ४० फूट रूंदीचा रस्ता
द.- ४० फूट रूंदीचा रस्ता उ.- प्लॉट नं. ११

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| गट नं. ५५/१ पैकी प्लॉट नं. १२ पूर्ण | लांबी- पू.प. १८.२९ मी. रुंदी- द.उ. १५.२४ मी. एकुण क्षेत्रफळ २७८.७३ चौ. मी. | प्रियंका विवेकचंद्र आव्हाड रा. कपूर गल्ली, जालना | लक्ष्मीकांत बापूराव माचिले, रा. अंबाजोगाई रोड, लातूर |

किंमत : २,००,०००/-

सदरील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. कार्यालयाला लेखी तक्रार अर्ज करावा.

मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**
ग्रामपंचायत साखरा
ता.जि. लातूर


छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते